पारावरच्या गप्पा

## नवे राष्ट्रीय कृषी कायदे–२०२०

# आताच कसं ठरवायचं तोटा का फायदा?

**योग्य अंमलबजावणीतून शेतकऱ्यांचं भलं होईल, अशी आशा बाळगूया!**



नेहमीप्रमाणे देवदर्शन घेऊन गणपत संपतची वाट पाहात पारावर बसला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसला. संपत आल्याबरोबर गणपत म्हणाला, ''संपा, अरे पेपरमध्ये वाचले का? शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी देशभरामध्ये मोठ्या प्रमाणात आंदोलने चालू आहेत. काय म्हणे तर, भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने नवीन विधेयक संसदेमध्ये मांडले आणि त्याला मंजुरी मिळाली. त्याला विरोध म्हणून पूर्ण देशभर आंदोलने सुरू आहेत. कोणी म्हणतो हे धोरण शेतकऱ्यांच्या फायद्याचे आहे, तर कोणी म्हणतो हे धोरण शेतकऱ्यांच्या विरोधात आहे. मला तर सर्व बातम्या वाचून आणखी गोंधळल्यासारखे झाले. आपल्या फायद्याचे काय आणि तोट्याचे काय, हे काही मला समजले नाही. म्हणून म्हटलं आपल्या 'हुश्शार' मित्राकडून याचा खुलासा करून घ्यावा!''

गणपतच्या या मिश्किल बोलण्यामुळे संपतलाही हसू आले. ''अरे गंपा, मी काही एवढा 'हुश्शार' नाही हं! आपलं करीत असतो वाचन आणि त्यामध्ये माझे मत टाकून सांगत असतो तुला. मी या क्षेत्रात तज्ज्ञ असतो तर कृषितज्ज्ञ किंवा अधिकारी नसतो का झालो? त्यापेक्षा तुझा मित्र आहे, चांगला प्रगतिशील शेतकरी झालो आहे, याचाच मला आनंद आहे.''

यावर मात्र गणपतने मान डोलावली आणि म्हणाला, ''ते जाऊ दे मित्रा, पण मला सांग हे तीन कायदे शेतकऱ्यांसाठी भारत सरकारने मंजूर केले त्याबद्दल तुझे मत काय आहे? त्यामुळे आपल्या शेतकऱ्यांचा फायदा होईल की तोटा, याबद्दल सांग.''

संपतही थोडासा सावरून बसत म्हणाला, ''हे बघ गंपा, भारत सरकारने तीन कायदे आणले आहेत. ते सोप्या भाषेत सांगायचे झाले तर पहिला कायदा म्हणजे शेतकऱ्यांनी तयार केलेल्या मालाची विक्री व्यवस्था आणि त्याचा व्यापार. दुसरा कायदा म्हणजे शेतकऱ्यांचे सशक्तीकरण आणि त्यांचे संरक्षण करणे. तिसरा कायदा म्हणजे अत्यावश्यक वस्तू कायदा. या तीन कायद्यांमुळे शेतीमालाला चांगला भाव मिळेल, असे सरकारला वाटते. यापूर्वी हरितक्रांती, धवलक्रांती, नीलक्रांती यांसारख्या शेती उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी अनेक क्रांत्या झाल्या. त्यातून शेतकऱ्यांनी शेती आणि शेतीपूरक व्यवसायांचे उत्पादन वाढविले. परंतु आज शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवूनही शेती व्यवसाय तोट्यात चाललाय. शेतीमध्ये उत्पादन खर्च वाढला परंतु उत्पादनांचे दर मात्र त्या प्रमाणात वाढले नाहीत. यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या वाढल्या. यापुढे शेतीक्षेत्राला शाश्वत स्वरुप द्यायचे म्हटल्यानंतर शेती उत्पादन काढल्यानंतर त्याची विक्री व्यवस्था सुधारून त्यातून शेतकऱ्याच्या पदरात दोन पैसे जास्त पडले तरच हा व्यवसाय किफायतशीर होईल. म्हणून काढणीपश्चात शेतीमाल

विक्रीसाठी पायाभूत सुविधा तयार करणे, विक्री व्यवस्था बळकट करणे तसेच शेतीमालाला हमखास भाव देणे या सर्व गोष्टी होण्यासाठी हे कायदे तयार केले, असे सरकारचे म्हणणे आहे.''

यावर गणपत मान डोलावून म्हणाला, ''तू म्हणतो ते मला पटते. मग शेतकरी संघटना आणि विविध राज्यांमध्ये लोक रस्त्यावर उतरून संप का करत आहेत? त्यांना या कायद्यांमुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल असे वाटत नाही काय?''

यावर संपत हसून म्हणाला, ''हे बघ, नाण्याला दोन बाजू असतात. एक तर संप करताना सर्वात महत्त्वाचा भाग असतो तो म्हणजे राजकारण. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे या कायद्यामध्ये दिलेल्या तरतुदींच्या संदर्भात आजपर्यंत काहीच झाले नाही असे नाही. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे कायदे करून सर्व काही साध्य होतेच असे नाही. त्यासाठी त्यामध्ये दिलेल्या तरतुदींचा गांभीर्याने अवलंब करून त्यांचा प्रत्यक्ष वापर करण्याची गरज आहे. आज या तीनही कायद्यांमुळे शेतकऱ्यांचा खरंच फायदा होईल की तोटा होईल, हे सांगणे एवढे सोपे नाही. कारण त्यांची अंमलबजावणी होताना नेमकी कशा पद्धतीने होते यावरच शेतकऱ्यांचा फायदा- तोटा अवलंबून आहे.''

यावर गणपत म्हणाला, ''हे बघ संपा, हे राजकारणी लोक आपल्या मनाचा फार गोंधळ करून देतात बघ. त्यामुळे तू त्यांना काय वाटतं, त्यापेक्षा तुला काय वाटतं ते सांग बरं. म्हणजे प्रत्येक कायद्याचा फायदा- तोटा काय होऊ शकतो याबद्दल सांग.''

त्यावर संपत हसत म्हणाला, ''हो रं गंपा. मी 'हुश्शार' आहे ना, मग सांगतो की! थोडा दम काढ! हे बघ, पहिला फायदा म्हणजे शेती उत्पादन विक्री व्यवस्था आणि व्यापार यामध्ये शेतकरी त्यांच्या शेतात तयार झालेला शेतीमाल कोठेही आणि कोणालाही विकू शकतो. आता सध्या त्याला तो शेतीमाल मार्केट यार्डात नेऊन मार्केट कमिटीने निवडलेल्या व्यापाऱ्यांनाच विकावा लागतो. तसेच यासाठी ठरवून दिलेला काही करही द्यावा लागतो. परंतु या नवीन कायद्यामुळे शेतकरी आता शेतीमाल मार्केट कमिटीबरोबरच इतर खासगी व्यापाऱ्यांनाही बाहेर विकू शकतो. तसेच अशा प्रकारचे मार्केट यार्ड सहकारीऐवजी खासगी पातळीवर सुरू होतील. यामुळे विक्रीमध्ये स्पर्धा होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाला जास्त भाव मिळेल असे वाटते. या सर्व गोष्टींसाठी खासगी संस्था तसेच व्यापारी शेतीमाल विक्री, साठवण, वाहतूक आणि वितरण व्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणात स्वत:चे खासगी भांडवल गुंतवतात. यामुळे सरकारला किंवा सहकारी संस्थांना जास्त भांडवल गुंतवणे गरजेचे नाही. तसेच त्यांच्याकडे भांडवल नसल्यामुळे शेतीमालाची नासाडी होते, तीही यामुळे थांबेल असे वाटते. अर्थात यामध्ये दोन धोके आहेत. एक तर या खासगी कंपन्या सुरुवातीला चांगले दर देतील आणि ज्यावेळी मार्केट कमिट्या पूर्णपणे उध्वस्त होतील त्यावेळी मात्र त्यांची मनमानी सुरू होऊन वाट्टेल त्या किंमतीला (म्हणजे भाव पाडून) ते शेतीमाल विकत घेतील. म्हणजेच त्यांची मोनोपॉली होईल. दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे शेतीमालाला हमीभाव या नियमानुसार सहकारी, सरकारी यंत्रणा आज अस्तित्वात आहे. भविष्यात त्यांचे खासगीकरण झाले तर मात्र शेतीमालाला हमीभाव देऊन शेतीमाल खरेदी करणे, या सरकारच्या धोरणाला खासगी कंपन्या हरताळ फासू शकतात. अर्थात या दोनही गोष्टींवर सरकारने नियंत्रण चांगले ठेवले आणि चांगल्या प्रकारची स्पर्धा खासगी- सरकारी- सहकारी यंत्रणांमध्ये पाहिली तरच शेतकऱ्यांचा फायदा होईल.''

गणपतच्या डोक्यात या पहिल्या कायद्याच्या माहितीने प्रकाशच पडला होता. ''अरं संपा, जर खरंच असं झालं तर आपण पाहिजे तेथे माल विकू शकतो. अर्थात आजही मार्केट कमिट्यांमध्ये काय गोंधळ सुरू असतो हे तुला माहीतच आहे. आता तू मला दुसऱ्या कायद्याबद्दल सांग.''

''हे बघ गंपा, दुसरा कायदा म्हणजे शेतकऱ्यांचे बळकटीकरण आणि त्यांचे संरक्षण. म्हणजेच शेतीमाल विक्री करताना त्यांना विक्री व्यवस्थेमध्ये पाठबळ देणे. यात सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे करार पद्धतीने शेती करणे. अर्थात यापूर्वीही करार पद्धतीने अनेक कंपन्या शेती उत्पादन तयार करत होत्या. परंतु शेतकरी व कंपन्या यांच्यात वाद झाला तर त्याला कायद्याचे पाठबळ मिळत नव्हते. यानंतर करार शेती करताना कायद्यानुसारच करावी लागेल. करार करणे, मोडणे किंवा त्यामध्ये काही बदल करणे ही सर्व बाब आता कायद्यानुसार होईल. त्यामुळे जे विकले जाईल किंवा जे कंपन्या विकत घ्यायला तयार आहेत त्याचे उत्पादन शेतकरी करतील. त्यासाठी लागणारे नवीन तंत्रज्ञान, निविष्ठा, भांडवलही कंपन्या उपलब्ध करून देतील. कंपन्यांनी ठरविलेल्या प्रतीचा आणि पाहिजे त्या प्रमाणात शेतीमाल तयार केला तरच कंपन्या ठरवून दिलेल्या किंमतीला तो माल विकत घेतील. त्यामध्ये काही बदल झाला तर करारामध्ये

नमूद केल्यानुसार कार्यवाही होईल. अर्थात यासाठी करार करताना शेतकऱ्यांना फार जागरूक रहावे लागेल. कारण आजपर्यंतचा अनुभव असा आहे की कंपन्या अनेक अटी, शर्ती टाकतात. स्वत:च्या हिताचा जास्त विचार करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. हा कायदाही तसा चांगला आहे. परंतु यामध्ये सरकारी यंत्रणेने प्रामाणिकपणे काम करून शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विचार करून निर्णय घेतला तरच शेतकऱ्यांचा फायदा होईल. पिकाचा विमा घेताना शेतकरी- विमा कंपन्या यांच्यातील वाद आणि त्यावर होत असलेली सर्व चर्चा बघता, ही पुनरावृत्ती भविष्यात 'करार शेती'मध्ये होऊ नये हीच अपेक्षा. या पद्धतीमध्ये कंपन्या त्यांच्या ग्राहकांच्या मागणीनुसार शेतकऱ्यांकडून पाहिजे त्या प्रतीचा शेतीमाल तयार करून घेतील. यामध्ये शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केला, तसेच कंपनीने दिलेल्या सल्ल्यानुसार पीक व्यवस्थापन केले तर शेती व्यवसायाला शाश्वत स्वरुप येऊ शकते.''

गणपतला हा मुद्दा चांगला पटला. ''कारं संपा, म्हणजे विकलं जाईल तेच पिकवलं तर आपल्याला विक्री व्यवस्थेची तसेच भावाची काळजी राहणार नाही. मग पूर्णवेळ आपण शेतीच्या कामासाठी देऊ शकतो. आता संपा, शेवटचा म्हणजे तिसरा कायदा काय सांगतो शेतकऱ्यांच्या कल्याणाचे?''

हसून संपत म्हणाला, ''काय सांगणार? तिसरा कायदा फारच गंमतीशीर आहे. १९५५ साली भारत सरकारने शेतीमालाचा 'अत्यावश्यक वस्तू कायद्या'त समावेश केला. कारण त्यावेळी शेती उत्पादन कमी आणि मागणी जास्त होती. त्यामुळे या कायद्यानुसार व्यापाऱ्यांना तेलबिया, कडधान्ये, अन्नधान्ये, साखर, कांदा, बटाटा यासारख्या विविध वस्तूंचा फार मोठ्या प्रमाणात साठा करण्यास प्रतिबंध होता. मात्र हळूहळू अनेक शेती उत्पादने या कायद्याच्या कक्षेच्या बाहेर आली. आता या नवीन कायद्यामुळे कोणतेही शेती उत्पादन हे अत्यावश्यक वस्तू कायद्याखाली येणार नाही. यामुळे शेतीमालाची साठवणूक करण्यावर कोणतेही निर्बंध खासगी संस्था किंवा व्यापाऱ्यांना राहणार नाहीत. यामुळे एक तर व्यापारी शेतीमाल मोठ्या प्रमाणात खरेदी करून साठविण्यासाठी अत्याधुनिक पद्धतीच्या साठवणुकीची व्यवस्था उभारतील. त्यामुळे त्यांची भांडवली गुंतवणूक वाढेल. यामध्ये शेतकरी व्यापाऱ्याला शेतीमाल विकू शकतील किंवा त्यांच्याकडे भाडेतत्त्वावर शेतीमाल साठवू शकतील. ज्यावेळी शेतीमालाला चांगला भाव येईल त्यावेळी शेतकरी शेतीमाल विकू शकतील. यातून शेतीमालाला चांगला भाव मिळेल, असे सरकारला वाटते. अर्थात नाण्याला दोन बाजू असतात या न्यायाने, शेतकऱ्यांना तसेच ग्राहकांना तोटाही होऊ शकतो. कारण यातून मोठ्या कंपन्यांची मक्तेदारी वाढली तर ते सांगतील त्या किंमतीला शेतकऱ्यांना शेतीमाल विकावा लागेल आणि ग्राहकाला तो विकत घ्यावा लागेल. अर्थात यासंदर्भात सरकारी यंत्रणेचा हस्तक्षेप कसा राहील, या बाबीवरच शेतकरी आणि ग्राहकांचा नफा- तोटा अवलंबून आहे. आज आपण बघतो की कांदा जीवनावश्यक वस्तू कायद्यातून बाहेर असूनही सरकार त्याच्या निर्यातीवर बंधणे आणते. तसेच साठेबाजी करणाऱ्यांवर कारवाई करते. यातही फार मोठी गंमत आहे. सरकार या कायद्यामध्ये सांगते की, त्या वस्तूंच्या सर्वसाधारण किंमतीपेक्षा- फळे, भाजीपाला यांच्या किंमती दुप्पट किंवा अन्नधान्यांच्या किंमती ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्या तर मात्र साठवणुकीवर निर्बंध आणले जातील. आता कांद्याचे उदाहरण घेऊ. कांद्याची 'सर्वसाधारण' किंमत म्हणजे किती, दुप्पट रक्कम म्हणजे किती याचा विचार न करताच त्यावर बंधने आणली जातात. मात्र याप्रमाणे इतर फळे, भाजीपाला यांचा विचार होत नाही. तसेच किंमती एकदम कमी झाल्यावर त्याबद्दल काय करणार यावरही काहीही चर्चा होत नाही. आधारभूत किंमती जाहीर होतात परंतु शेतकऱ्यांना मात्र त्यांच्या शेतीमालाला त्याप्रमाणे बाजारभाव मिळत नाही. दरनिश्चितीच्या संदर्भात असे अनेक प्रश्न आहेत.''

यावर मात्र गणपतचा चेहरा पडला. तो म्हणाला, ''कारं संपा, मग या शेतकऱ्यांसाठी केलेल्या कायद्याचा फायदा होणार नाही! मग काय उपयोग झाला?''

यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, स्वातंत्र्य मिळाल्यापासून, म्हणजे विशेषत: हरितक्रांती झाल्यापासून शेतकऱ्यांचे उत्पादन आणि त्या अनुषंगाने त्यांना मिळणारे उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले आणि आजही केले जात आहेत. त्यापैकीच हा एक प्रयत्न आहे. या प्रयत्नातून काय चांगले बाहेर येईल आणि काय वाईट ही बाब काळच ठरवेल. पण हे बघ, आपली शेती पूर्णपणे बेभरवशाची आहे. तरीही आपण आपला मार्ग बदलत नाही. आपण सदैव आशावादी असतो. त्याचप्रमाणे या कायद्याबद्दल आताच एकदम वाईट बोलण्यापेक्षा आशावादी राहूया. यातून शेतकऱ्याचे काहीतरी भले होईल, अशी प्रार्थना करूया. चल आता चहा घेऊ, आणि लागू कामाला.''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■